**प्रेसनोट दि. २२.०६.२०२२**

समीर शमशुद्दीन मुल्ला, वय.४३ वर्षे, व्यवसाय- पेंटींग, रा. स्काय लाईन बिल्डींग, इंगळेकर हॉस्पीटल जवळ, पलूस, ता. पलूस जि. सांगली खाजगी इसम याने ८०,०००/- रुपये लाच स्विकारली नंतर रंगेहात पकडले व खाजगी इसम सचिन संपत औटे वय ४० वर्षे, व्यवसाय शेती, रा. पोष्ट ऑफीस जवळ कुंडल, ता. पलूस जि. सांगली यांने आरोपी समीर शमशुद्दीन मुल्ला यास लाच स्विकारणेस प्रोत्साहन दिलेने त्यांना ताब्यात घेतले. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सांगलीची कारवाई.

---

पलूस पोलीस ठाणे येथे फसवणुकीच्या गुन्ह्यात अटकेत असलेले तक्रारदार यांचे भाऊ यांना गुन्ह्यात सहकार्य करणे करीता व त्यांचेवर आणखीन गुन्हे दाखल करु नये याकरीता खाजगी इसम समीर शमशुद्दीन मुल्ला यांने तक्रारदार यांचेकडे १,००,०००/- रूपयेची लाच मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी इकडील कार्यालयाकडे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १९.०६.२०२२ रोजी व दि.२०.०६.२०२२ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये खाजगी इसम समीर शमशुद्दीन मुल्ला यांनी तक्रारदार यांच्याकडे पोलीस अधीकारी यांना सांगुन मदत करतो असे म्हणुन १,००,०००/- रुपये लाचेची मागणी करुन चर्चेअंती ८०,०००/- रूपये पोलीस अधीकारी यांचेकरीता लाचेची मागणी केली व लाच रक्कम घेवून येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.२१.०६.२०२२ रोजी पलूस येथील नवीन एस.टी. स्टॅण्ड जवळ सापळा लावला असता खाजगी इसम समीर शमशुद्दीन मुल्ला यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून तक्रारदार यांचेकडून ८०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारली असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. तसेच खाजगी इसम सचिन संपत औटे यांनी आरोपी क्र १ यांना याकामी प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने समीर शमशुद्दीन मुल्ला, व सचिन संपत औटे यांचे विरुध्द पलूस पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्री सुरज गुरव सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे सो पोलीस उप अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली श्री. विनायक भिलारे, पोलीस निरीक्षक, श्री दत्तात्रय पुजारी, पोलीस निरीक्षक, तसेच पोलीस अंमलदार अविनाश सागर, प्रितम चौगुले, धनंजय खाडे, संजय संकपाळ, भास्कर भोरे, बाळासाहेब पवार, सिमा माने यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सत्यमेव जयते

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with Oken Scanner